## निवडक

### कला अकादमीच्या राज्यस्तरीय कला प्रदर्शनाचा निकाल जाहीर

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १२** : कला अकादमी आयोजित ४९ व्या विद्यार्थी विभाग राज्यस्तरीय कलाप्रदर्शनाचा निकाल जाहीर करण्यात आला असून पेंटिंग व ग्रारफीक प्रिंट विभागातून मोहित कमलेश विश्वकर्मा, अप्लाईड आर्ट व ग्राफीक डिझाइन विभागातून दिलखुष दत्ता गुरव, तर स्कल्पचर विभागातून यज्ञय रेडकर यांचा कलाकृतींची प्रथम पुरस्कारासाठी निवड झाली आहे. कीर्तीकुमार प्रभू, प्रदीप नाईक व श्रीमती रधीमा जोगळे नाईक या तज्ञांचा समावेश असलेल्या परीक्षक मंडळाने राज्यकला प्रदर्शनासाठी आलेल्या प्रवेशिकांमधून कलाकृतींचे समग्र मूल्यमापन करून सविस्तर निकाल दिला आहे. कला प्रदर्शनासाठी एकूण १७० कलाकृती आल्या होत्या त्यामधून १०३ कलाकृतींची प्रदर्शित करण्यासाठी निवड करण्यात आली आहे. सविस्तर निकालानुसार पेंटिंग व ग्राफीक प्रिंट विभागातून नोह हेडन फर्नांडिस यांना द्वितीय तर समृद्धी केरकर यांना तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. अप्लाईड आर्ट व ग्राफीक डिझाईन विभागूतून रीया विशांत माशेलकर याला द्वितीय तर श्रीनिवास नायक यांना तृतिय पारितोषिक प्राप्त झाले आहे. स्कल्पचर विभागातून मोहित कमलेश विश्वकर्मा यांना तृतिय
च्यारी यांना तृतिय पारितोषिकासाठी निवड करण्यात आली आहे.
गोवा हिंदू असोसिएशनतर्फे कै. रावजी गावणेकर स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणारे बक्षीस सलील साईदास वेळीप याना ढेण्यात आले आहे. तर लक्षिता पेडणेकर याना कै. हनुमंत नेवगी स्मृती पारितोषिक जाहिर करण्यात आले आहे. सदर प्रदर्शनाचे उद्घाटन आज रोजी संध्याकाळी ४.३० वाजता कला अकादमीचे सदस्य सचिव अरविंद खुटकर यांच्या हस्ते होणार आहेत. तरी सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी व कलाप्रेमी रसिकांनी आवर्जून उपस्थित राहावे असे कला अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे. हे प्रदर्शन १७ पर्यंत कला अकादमीच्या कला दालनात सकाळी १० ते संध्याकाळी ७ पर्यंत सर्व रसिकांसाठी खुले राहिल.या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभाची तारीख मागाहून जाहिर करण्यात येईल. विद्यार्थीव कलाप्रेमी रसिकांनी याची नोंद घ्यावी, असे कला अकादमीतर्फे कळविण्यात आलेआहे.

---

### बटोरा भागात उद्या वीज पुरवठा खंडित

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १२** : बटोरा ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. १४ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत बटोरा भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे पिकेन रूंबोर्डे ट्रान्सफॉर्मरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने १५ रोजी सकाळी ९ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत पिकेनो रूंबोर्डे, कुडतरी बाजार भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### मनोहर पर्रिकर यांची १७ रोजी पुण्यतिथी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १२** : भारत सरकारचे माजी संरक्षण मंत्री आणि गोव्याचे माजी मुख्यमंत्री स्व. मनोहर पर्रिकर यांची पुण्यतिथी दि. १७ रोजी सकाळी ९ वाजता मिरामार येथील स्मृती स्थळावर पाळण्यात येईल. गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि इतर मान्यवर स्व. पर्रीकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून समाधीवर पुष्पांजली अर्पण करतील.

# भाऊसाहेब बांदोडकरांचे कार्य पुढे नेऊया

## माजी सरपंच प्रशांत नाईक | मांद्रेत बांदोडकर जयंती उत्साहात साजरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १२** : गोमंतकाचे पहिले मुख्यमंत्री आणि भाग्यविधाते भाऊसाहेब बांदोडकर यांची प्रेरणा घेण्यासाठी त्यांचे गुण घेण्यासाठी त्यांच्याकडे अनेक विचार होते. तेच प्रेरणा स्त्रोत होते. त्यामुळेच आजही गोमंतकाचा जो झपाट्याने विकास होत आहे. त्या विकासाचा खरा पायाभूत शिल्पकार जर कोणी असेल तर ते भाऊसाहेब बांदोडकरच होते, असे प्रतिपादन मांद्रेचे माजी सरपंच तथा विद्यमान पंच प्रशांत नाईक यांनी भाऊसाहेब बांदोडकर यांच्या जयंतीनिमित्त मधला माज मांद्रे येथील अर्ध पुतळ्याजवळ पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली त्यावेळेस ते बोलत होते.



मांद्रे : भाऊसाहेब बांदोडकर जयंतीनिमित्त आदरांजली वाहताना मांद्रेचे माजी सरपंच प्रशांत नाईक व इतर.

प्रशांत नाईक यांनी पुढे सांगितले, भाऊसाहेब बांदोडकर यांचे कार्य अजरामर कार्य आहे. प्रत्येक सरकारी शाळेमध्ये प्रत्येक स्कूलमध्ये भाऊसाहेब बांदोडकर यांची जयंती साजरी केली जाते. शासकीय पातळीवर नीम शासकीय पातळीवर त्यांची जयंती साजरी करणारे ते एकमेव नेते होते.

भाऊसाहेब बांदोडकर यांनी त्या काळात गावागावात शाळा सुरू केल्या. त्या काळात आर्थिक स्थिती तेवढी चांगली नव्हती. तरीही शाळा सुरू करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आणि आजची शिक्षण पद्धती आज अनेक सुविधा उपलब्ध होत असतात. भावूसाहेब बांदोडकर यांचे विचार समोर घेऊन प्राथमिक शैक्षणिक सुविधा ना संस्थाना सुविधा पुरवण्यावर त्यांना मदत करणे शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी आम्ही कार्यरत आहोत. ही प्रेरणा आम्हाला भाऊसाहेब बांदोडकर यांच्याकडून मिळत आहे.

प्रशांत नाईक यांनी सांगितले की, सरकार मुंडकरांच्या केसेस विषयी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी स्वतः पुढाकार घेऊन त्यांना न्याय देण्याचे जो विडा उचलला त्याचं आपण अभिनंदन करतो. शिवाय ज्या पद्धतीने मुंडकरासाठी न्याय देण्याचे सरकारने धाडस दाखवलेले आहेत, त्याचप्रमाणे कुळानाही न्याय मिळवून द्यावा, अशी त्यांनी मागणी केली. भाऊसाहेब बांदोडकर यांनी आपल्या कार्यकाळात असेल त्यांची जमीन असा कायदा केला.त्या कायद्याची योग्य पद्धतीने आज अंमलबजावणी करण्याची गरज आहे. ती जर सरकारने केली तरच खऱ्या अर्थाने भाऊसाहेब बांदोडकर यांना आदरांजली मिळेल. असा विश्वास नाईक यांनी व्यक्त केला. कुळाच्या केसेस सरकारने लक्ष घालून त्यांनाही जमिनी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे, अशी मागणी प्रशांत नाईक यांनी केली.

# शिमगोत्सव समितीतर्फे पणजीत उद्या गुलालोत्सव

▶ **१९ पासून विविधरंगी कार्यक्रम**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १२** : १९८९ मध्ये गोव्याच्या राजधानीत पणजी शिमगोत्सव समितीतर्फे प्रथम सुरू झालेला शिमगोत्सव यंदा ३७ वर्षात पदार्पण करत असून यंदाही शुक्रवार दि. १४ रोजी सकाळी ९ ते दुपारी १२.३० पर्यंत आझाद मैदानावर ओम बिट्स वाद्यवृंदाच्या तालावर रंगपंचमीदिनी गुलालोत्सव साजरा होणार आहे व त्यात धर्म, जातीभेद, विसरुन अबालवृद्ध, महिला सहभागी होतील. १९ मार्च पासून आझाद मैदानावर रोज संध्याकाळी ७ वाजता विविधरंगी सांस्कृतिक कार्यक्रम सादर होतील. दरम्यान शनिवार दि. २२ रोजी दुपारी ३.३० वाजल्यापासून जुन्या सचिवालयाकडील डी. बी. बांदोडकर मार्गावरील भाऊसाहेब बांदोडकर यांच्या पुतळ्याकडून रोमटामेळ, चित्ररथ, लोकनृत्य, वेशभूषा आदींचा समावेश असलेली भव्य मिरवणूक निघेल. पणजी शिगमोत्सव समितीचे अध्यक्ष श्रीनिवास धेंपे यांनी आज पत्रकार परिषदेत, पणजीचे महापौर रोहित मोन्सेरात, समितीचे कार्यकारी अध्यक्ष मंगलदास नाईक व सचिव शांताराम नाईक यांच्या उपस्थितीत उत्सवाचा कार्यक्रम जाहीर केला.

गोव्याच्या पारंपरिक संस्कृतीचे दर्शन शहरात घडावे या उद्देशाने पणजी शिगमोत्सव समितीतर्फे पणजीत सुरू झालेला हा उत्सवलोकप्रिय झाला व राज्य उत्सव बनला आणि आज तो गोव्याच्या विविध भागात अशा पद्धतीने साजरा केला जातो याचा आनंद आहे, असे श्रीनिवास धेंपे यांनी सांगितले. यंदा दहा लाख सत्तावीस हजार रुपयांची विविध स्पर्धांसाठी बक्षिसे देण्यात येतील. मंगलदास नाईक यांनी सांगितले की चित्ररथ ,रोमटामेळ पथकांनी वेळेत आपले सादरीकरण करून सहकार्य करावे कारण आबाल वृद्ध तासनतास चित्ररथ पाहण्यास तिष्ठत असतात व मग त्यांचा विरस होतो. शांताराम नाईक यांनी, यावर्षी स्पर्धांच्या प्रवेशिका दुपारी अडीच ते साडेपाच पर्यंत उपलब्ध असतील व ते संध्याकाळी ७ पर्यंत सादर करावे लागतील.


### कार्यक्रमांची रेलचेल

**१४ रोजी संध्याकाळी ७ वाजता सांज मेलोडीज ऑर्केस्ट्रा सादर होईल. यात हिंदी सिनेगीते, नृत्य याचा आविष्कार असेल. १९ रोजी संध्याकाळी ७ वाजता ओंकार मेलोडिज ऑर्केस्ट्रा सादर होईल. त्यात मैबाम कुंजराज (मणिपूर), दीपश्री शानबाग (मुंबई), ऋतुजा लोटलीकर, प्रतिक्षा कोरगावकर व प्रसन्न भेंडे (गोवा) हे गायक व स्वाती आणि सेजल (मुंबई) या नृत्यांगना सहभागी होतील. २० रोजी संध्याकाळी ७ वाजता राजदिप नाईक निर्मित व श्रीनिका क्रिएशन नागेशी प्रस्तुत मिस्टर अँड मिसेस दाबोलकर हे कोकणी विनोदी नाटक सादर करण्यात येणार आहे. २१ रोजी संध्याकाळी ७ वाजता निषाद क्रिएशन प्रस्तुत मराठी भावगीते, भक्तिगीते, चित्रपटगीते, युगुलगीतांचा संगम असलेला रुपेरी वाळूत हा बहारदार कार्यक्रम होईल. यात सुर नवा ध्यास नवा.. व झी युवा संगीत सम्राट चा टॉप चा मानकरी प्रणय पवार (मुंबई), नामवंत सुगम आणि गझल गायिका वर्षा जोशी (संभाजीनगर), कल्पा सायनेकर व सिया काकोडकर (गोवा) या गायककलाकारांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील नामवंत निवेदन प्रफुल्ल वालावलकर हे निवेदन करतील. दि. २३ रोजी संध्याकाळी ७ वाजता एका पेक्षा एक अप्सरा हा बाबा पठाण निर्मित पुणे येथील लावणीचा समारोपाचा कार्यक्रम रंगणार आहे. यात नृत्य चंद्रिका भाग्यश्री नगरकर, नृत्य बिजली सुनीता पाटील, आयटमगर्ल संगीता जाधव, लावण्य सुंदरी स्नेहल व वन्समोर क्वीन लंका जावळे या खास आकर्षण असेल.**

### आयसीस वनडे रँकिंगमध्ये रोहित तिसऱ्या स्थानी

**मुंबई, दि. १२** :

भारतीय कर्णधार रोहित शर्मा आयसीसी एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे, तर संघाचा उपकर्णधार शुभमन गिल अजूनही अव्वल स्थानावर आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यात ७६ धावांची शानदार खेळी करणाऱ्या रोहित शर्माने आयसीसीच्या ताज्या एकदिवसीय क्रमवारीत २ स्थानांची झेप घेतली. बुधवारी जाहीर झालेल्या क्रमवारीत रोहितने विराट कोहली आणि हेन्रिक क्लासेनला मागे टाकले. रोहितचे रेटिंग ७५६ पर्यंत वाढले आहे. विराट पाचव्या स्थानावर घसरला आहे.




RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १९० **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 190 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .